# पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

**-: प्रेस नोट :-** **दिनांक - ०२/०१/२०२५**

**देवनार, कुर्ला, आग्रीपाडा परिसरात अंमली पदार्थ विरोधी कारवाईत ३९६ ग्रॅम 'कोकेन', १७० ग्रॅम एम.डी. सह ९०० कोडेन बॉटल्स् एकुन कि.अं.रू. १.६५ करोड रूपयांपेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करत दोन परदेशी नागरीकांसह एकुन चार ड्रग्ज तस्करांना केले जेरबंद.**

| | |
|---|---|
| **अं.प.वि., गु.र.क्र. व कलम** | १) ०१/२०२५, एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ अन्वये **(घाटकोपर युनिट)**<br>२) ०२/२०२५, एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ अन्वये **(घाटकोपर युनिट)**<br>३) ०३/२०२५, एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ अन्वये सह परदेशी नागरीक कायदा **(वरळी युनिट)** |
| **दाखल दिनांक** | दिनांक ०१/०१/२०२५ |
| **घटनास्थळ** | देवनार-गोवंडी, कुर्ला, आग्रीपाडा, मुंबई |
| **आरोपी** | १) नयुम शेख, वय २८ वर्षे,<br>२) संजीब सरकार, वय ४० वर्षे,<br>३) मोहम्मद बाप्टिस्टा, वय २४ वर्षे, नायझेरियन नागरीक<br>४) फेथ इग्नीबोसा, वय २५ वर्षे, नायझेरियन नागरीक **एकूण ०४ आरोपी.** |
| **जप्त मुद्देमाइल व अंदाजे किंमत** | **एकुण ३९६ ग्रॅम वजनाचा 'कोकेन', तसेच १७० ग्रॅम एम.डी. व ९०० कोडेन बॉटल्स् हा अंमली पदार्थ एकूण कि.अं.१,६५,८०,०००/- रूपयांपेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त.** |

मुंबई पोलीस आयुक्तालयात ३१ डिसेंबर व नववर्ष स्वागत च्या अनुशंगाने मा वरिष्ठांनी आदेशीत केलेल्या विशेष मोहिमेदरम्यान अंमली पदार्थ विरोधी कक्षाने केलेल्या कारवाईत **घाटकोपर युनिट अ.प.वि.कक्ष** यांनी दिनांक ०१/०१/२०२५ रोजी देवनार, गोवंडी, मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे छुप्या पध्दतीने **'कोडेन'** फॉस्फेट मिश्रीत बॉटल्स् हा अंमली पदार्थ विक्री करणारा नयुम शेख, वय २८ वर्षे, यास ताब्यात घेतले. नमुद आरोपीचे ताब्यातून **'९०० कोडेन'** मिश्रीत बॉटल्स् हा अंमली पदार्थ किंमत अंदाजे रूपये ४,५०,०००/- रूपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच घाटकोपर युनिट, अं.प.वि.कक्ष यांनी केलेल्या दुसऱ्या कारवाईत कुर्ला (पुर्व) परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे **'कोकेन'** अंमली पदार्थ विक्री करणारा संजीब सरकार, वय ४० वर्षे, यास ताब्यात घेतले. नमुद आरोपीचे ताब्यातून एकुन **'३९६ ग्रॅम कोकेन'** हा अंमली पदार्थ किंमत अंदाजे रूपये १,१८,८०,०००/- रू. चा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. नमूद दोन्ही गुन्हयाचा पुढील तपास घाटकोपर युनिट करत आहे.

तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे **वरळी युनिटने** दिनांक ०१/०१/२०२५ रोजी आग्रीपाडा, मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे **मॅफेड्रॉन** विक्री करणाऱ्या दोन नायझेरियन नागरीकांना ताब्यात घेतले असता मोहम्मद बाप्टिस्टा, वय २४ वर्षे याचे ताब्यातुन १०० ग्रॅम वजनाचा एम.डी. व फेथ इग्नीबोसा, वय २५ वर्षे, हिचे ताब्यातुन ७० ग्रॅम वजनाचा एम.डी. असा एकुन **१७० ग्रॅम एम.डी.** हा अंमली पदार्थ किंमत अंदाजे रूपये ४२,५०,०००/- रू जप्त करण्यात आला. नमूद दोन्ही नायझेरियन अटक आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असुन नमूद गुन्हयाचा पुढील तपास वरळी युनिट करत आहे.

**अशा प्रकारे तिन्ही कारवाईत एकुण ३९६ ग्रॅम वजनाचा 'कोकेन' तसेच १७० ग्रॅम वजनाचा 'मॅफेड्रॉन' एम.डी. व ९०० कोडेन मिश्रीत बॉटल्स् हा अंमली पदार्थ कि.अं.१,६५,८०,०००/-रूपयांपेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात येवुन गुन्हयाचा पुढील तपास करण्यात येत आहे.**

**अंमली पदार्थ विरोधी कक्षाने सन २०२४ मध्ये एकूण ९३ गुन्हे दाखल करत त्यामध्ये एकूण १८४ अंमली पदार्थ तस्करांना अटक केली असून, त्यांचे ताब्यातून एकूण ३४९२.८७६ किलो वचनाचा अंमली पदार्थ कि.अं. ६०.६३ कोटीपेक्षा अधिक किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात यश आले आहे. अशाप्रकारे बृहन्मुंबई पोलीस हे अंमली पदार्थ मुक्त समाज निर्मितीसाठी सतत प्रयत्नशिल आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, मा. पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, घाटकोपर युनिटचे प्रभारी पो.नि. श्री. अनिल ढोले, वरळी युनिटचे प्रभारी पो.नि.श्री. संतोष साळुंखे यांचे नेतृत्वाखाली अंमली विरोधी कक्षाच्या पथकांनी केली आहे.

--/--





